**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. मुकुंद गोविंद मोरे **अपीलकर्ता**
घर नं. ५६५, गोकुळ शिरगांव आद्योगिक वसाहत,
माळवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका.कोल्हापूर **उत्तरवादी**
**जन माहिती अधिकारी तथा** उप शहर अभियंता,
कोल्हापूर महानगरपालिका. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१९६२/२००९/ कोल्हापूर** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३-८-२००९ व दि.२९-७-२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६-९-२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३-९-२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५-१०-२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांना दिलेला दिनांक २-३-२००९ व दिनांक २.५.२००९ रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. मुकुंद गोविंद मोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन माहिती मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्रपणे अपील करणे आवश्यक आहे. सबब, अपीलकर्ता श्री. मोरे यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. तानाजी दादू धुंदरे **अपीलकर्ता**
मु. पो. साबळेवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर **उत्तरवादी**
**जा माहिती अधिकारी तथा** नायब तहसीलदार करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१९६८/२००९/ कोल्हापूर** |
| २ | जा माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०-७-२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०-९-२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** केस नं. ५/९६ च्या व फेरफार क्र.२४५/६/११/९५ च्या निकालाची सही शिक्कयाची नक्कल | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. तानाजी दादु धुंदरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलासोबत आवश्यक शुल्क रु. २०/- (मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणारनाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणेः-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि. २८.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. शांतीलाल जवरीलाल नाहटा
४९२, शनिवार पेठ, बाजीराव रोड, पुणे-३० — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह पोलीस आयुक्त, पुणे शहर,पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७ + १९८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.११.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** | श्री. शांतीलाल जवरीलाल नाहटा<br>४९२, शनिवार पेठ, बाजीराव रोड, पुणे-३० |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.७.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

न्यायालयाच्या आदेशासंदर्भात पोलिसांनी कार्यवाही न केल्याबाबत आपण मागितलेली माहिती देण्यात आली नाही. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पोलिसांनी योग्य कार्यवाही केलेली नाही. गुन्हयाचा तपास कशा पध्दतीने झाला याचा खुलासा मिळालेला नाही, आपल्याला एफ.आय.आर. ची प्रत देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सह पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना दिले होते. तसेच ४५ दिवसांत ऊर्वरित माहिती देण्याचे 'विशेष अपील निर्गत

कार्यक्रमा'त जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. के. व्ही. इंदलकर यांनी मान्य केले होते. त्यानुसार माहिती देण्यात आली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. शांतीलाल जवरीलाल नहाटा यांनी केली.

श्री. नहाटा यांनी अनेक बाबींमध्ये स्पष्टीकरण व भाष्य यांची मागणी केलेली आहे. तसेच पोलिसांनी संबंधित प्रकरणी केलेल्या कार्यवाहीबाबत आक्षेप नोंदविले आहेत. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसल्याचे त्यांना जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर स्पष्ट करण्यात आले असून अन्य माहिती देण्यात आली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्री. के. व्ही. इंदलकर यांनी केले.

श्री. नहाटा यांनी मूळ अर्जामध्ये पोलिसांची कार्यपध्दती व न्यायालयीन निर्णयानुसार करावयाची कार्यवाही याबाबत भाष्य करून त्यानुसार स्पष्टीकरण, खुलासा अथवा अन्वयार्थ यांची मागणी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ही 'माहिती' ठरत नाही. तसेच पोलिस आयुक्तांच्या स्वाक्षरीनेच उत्तर मिळाले पाहिजे, अशी त्यांनी केलेली मागणी माहितीच्या अधिकारात येत नाही. तथापि एफ.आय.आर.ची प्रत व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी कबूल केल्यानुसार, न्यायालयाच्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती अद्याप दिली गेली नसल्याची तक्रार श्री. नहाटा यांनी केली. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. के. व्ही. इंदलकर व संबंधित अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे यांनी याबाबत एक आठवड्यात खुलासा करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि अनेकदा स्मरण दिल्यानंतरही विहित मुदतीत त्यांनी अहवाल सादर केला नाही. सहायय्क पोलिस आयुक्त,स्वारगेट विभाग, पुणे श्री. अभय येवले व सहाय्यक पोलिस निरीक्षक, स्वारगेट पोलिस स्टेशन श्री. के. व्ही. इंदलकर यांनी दि.२९.१२.२००९ रोजी आयोगाला अहवाल सादर केला. श्री. नहाटा यांनी दि. १७.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्यात आली असून संबंधित प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट आहे, असे खुलाशात नमूद केले आहे. पोलीस शिपाई श्री. सतीश जाधव यांना माहिती आयोगाला सादर करण्याबाबत कळविले असल्याचे श्री. इंदलकर यांनी खुलाशात म्हटले असून ही बाब आक्षेपार्ह

आहे. अहवाल सादर करण्याची त्यांची स्वतःची जबाबदारी होती. ती त्यांनी पार पाडलेली नाही, त्याबद्दल ते कारवाईस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. **अपिले** निकाली काढण्यात येत आहेत.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार व वारंवार स्मरण दिल्यानंतरही सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री. के. व्ही. इंदलकर यांनी विहित मुदतीत आयोगाला अहवाल सादर केला नाही, तसेच कनिष्ठ पातळीवर हे काम सोपवून, त्याच्या पूर्ततेची दक्षताही न घेता सुमारे एक वर्षांनंतर आयोगास त्याबाबत कळविले. याबाबत सहाय्यक पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे यांनी त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. २०.१.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. २१.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.तुकाराम महादेव ताटे
४/३४, उत्तर सदर बझार, विद्यानगर, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००८ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.आय.बी.हुबळीकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.३.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

प्राथमिक शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांबाबत आपण मागितलेली माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.तुकाराम महादेव ताटे यांनी आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात केली आहे.

श्री.ताटे यांनी मागितलेली माहिती कायदेशीर प्रकरणाशी संबंधित असल्यामुळे विधी सल्लागारांचा सल्ला घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांना विहित मुदतीत उत्तर दिले. त्यांना माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी तीन तारखांच्या सुनावणीनंतर दिले. तथापि श्री.ताटे यांची मूळ मागणी वेतनवाढीच्या नोंदीसंबंधाने आदेश व निवडश्रेणी मिळण्यासंबंधीची आहे. वेतनवाढीच्या नोंदीसंबंधीचा आदेश त्यांना देण्यात आला असून निवडश्रेणीबाबतची वस्तुस्थिती शासन निर्णयासह त्यांना स्पष्ट करण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.आय.बी.हुबळीकर यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. शिक्षण संचालकांकडे याबाबत मार्गदर्शन मागितले असल्याचे त्यांनी सांगितले. मार्गदर्शनानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अहवाल प्राप्त न झाल्यामुळे आयोगाने केलेल्या विचारणेनंतर अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.वि.वि.जगताप यांनी दि.४.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अहवाल सादर केला आहे. दि.१८.८.२००८ च्या पत्रान्वये शासनाकडे मार्गदर्शन मिळण्याची विनंती करण्यात आली असून दि.४.४.२००९ च्या पत्रान्वये स्मरणपत्र पाठविले आहे. शासनाकडून मार्गदर्शन अद्याप अप्राप्त आहे. मार्गदर्शन प्राप्त होताच पुढील कारवाई केली जाईल, असे त्यांनी या अहवालात नमूद केले

आहे. आयोगास अहवाल सादर करण्यातील विलंबाबाबत जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.आय.बी.हुबळीकर व अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.वि.वि.जगताप यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. उदय चंद्रकांत वारकरी
मु. पो. कोडोली, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक,
भूमी अभिलेख विभाग, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जना माहिती अधिकारी तथा** तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **११७०/२००९/ कोल्हापूर** |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>कसबे कोडोली, ता.पन्हाळा येथील मिळकत क्र.६७७, ६७९ व १६२७ च्या मोजणीसंदर्भातील खुलासा | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. उदय चंद्रकांत वारकरी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

सौ.कुसूम वसंत शिंगोटे
श्री.विशाल वसंत शिंगोटे
मु.पो.काळवाडी, व्हाया पिंपळवडी,
ता.जुन्नर, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, तहसीलदार कार्यालय आवार,
मु.पो.ता.जुन्नर, जि.पुणे

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७२/२००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.०९.२००९ |

**विवेचन**

अपीलकर्ता सौ.कुसूम वसंत शिंगोटे व श्री.विशाल वसंत शिंगोटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. सबब उक्त अधिनियमातील कलम १९(१) अन्वये संबंधित अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील करणे आवश्यक असल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. : २२-१२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. वसंत सावळाराम वायाळ
मु.पो.पाटस, ता.दौंड, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
पंचायत समिती दौंड, ता.दौंड, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत पाटस, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७३/२००९/ पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.०७.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२४.०८.२००९ |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. वसंत सावळाराम वायाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलासोबत आवश्यक शुल्क (रुपये २०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : १९ / १२/२००९**

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.भारत गणेश उबाळे
सर्व्हे नं.११८/१११, गोविंद जनरल स्टोअर्ससमोर,
शांतीनगर, येरवडा, पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** **उत्तरवादी**

१) सहसंचालक, हिवताप हत्तीरोग व जलजन्य आजार, सेंट्रल बिल्डिंग, पुणे-१
२) सहसंचालक, हिवताप हत्तीरोग व जलजन्य आजार, सेंट्रल बिल्डिंग, पुणे-१
३) सहसंचालक, हिवताप हत्तीरोग व जलजन्य आजार, सेंट्रल बिल्डिंग, पुणे-१
४) सहसंचालक, हिवताप हत्तीरोग व जलजन्य आजार, सेंट्रल बिल्डिंग, पुणे-१

**जन माहिती अधिकारी तथा**

१) सहसंचालक हिवताप हत्तीरोग व जलजन्य आजार, पुणे यांचे कार्यालय,सेंट्रल बिल्डिंग, पुणे-१
२) सहसंचालक हिवताप हत्तीरोग व जलजन्य आजार, पुणे यांचे कार्यालय,सेंट्रल बिल्डिंग, पुणे-१
३) सहसंचालक हिवताप हत्तीरोग व जलजन्य आजार, पुणे यांचे कार्यालय,सेंट्रल बिल्डिंग, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७५/२००९ /पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.७.२००९, १.१०.२००९ व २४.०७.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.८.२००९,९.९.२००९ व २२.९.२००९ |
| ४ | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.भारत गणेश उबाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब श्री.उबाळे यांच्या या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. : २२-१२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश दिनकर गायकवाड
१३२५/२७, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जना माहिती अधिकारी** तथा आरोग्य अधिकारी,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश दिनकर गायकवाड
१३२५/२७, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर श्री.गणेश देशमुख

**जना माहिती अधिकारी** तथा आरोग्य अधिकारी,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर डॉ.सुधीर देशमुख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.७.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.६.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

स्त्रीभ्रूण हत्याविरोधी कायद्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, कोल्हापूर महानगपालिका, जि.कोल्हापूर यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर यांनी माहिती देण्याचा आदेश देऊनही संपूर्ण माहिती दिली जात नाही. इस्पितळांची नोंदणी, वर्षातून दोनदा भेटी देऊन तपासणी याबाबतची नियमानुसार आवश्यक असलेली कार्यवाही केली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सुरेश दिनकर गायकवाड यांनी केली.

श्री.गायकवाड यांनी तीन इस्पितळे व अन्य एक वैद्यकीय स्वरूपाची संस्था यांच्या बाबतीत केलेल्या विविध अर्जांचाच माहितीच्या अधिकारातील अर्ज हा एक भाग आहे. त्यांचा अर्ज आल्याच्या दुसऱ्याच दिवशी संबंधित कागदपत्रांच्या प्रती व माहिती त्यांना देण्यात आली. अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगपालिका, जि.कोल्हापूर यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करून श्री.गायकवाड यांना माहिती देण्याबरोबरच आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाहीही केली. त्यांच्या दोन्ही अर्जांबाबत याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, कोल्हापूर महानगपालिका, जि.कोल्हापूर

डॉ.सुधीर देशमुख यांनी केले. त्यांचे प्रतिपादन रास्त असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगपालिका, जि.कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.गणेश देशमुख यांनी सांगितले.

उभय बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे पाहता मागितलेली माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली आहे. नियमानुसार कार्यवाही होत नसल्याबाबतची त्यांची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि त्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाही केली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, कोल्हापूर महानगपालिका व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, आरोग्य अधिकारी, कोल्हापूर महानगपालिका यांचे निवेदन लक्षात घेता त्याबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी एका आठवड्यात आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर डॉ.सुधीर देशमुख यांनी दि.९.१.२००९ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय अहवाल आयोगाला सादर केला, तो स्वीकारण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २२.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनिल हिराचंद शहा
१६५, रविवार पेठ, फलटण, जि.सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सचीव, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक सचीव, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.२.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री. अनिल हिराचंद शहा
१६५, रविवार पेठ, फलटण, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक सचीव, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४ श्री. अरूण दत्तात्रय कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.११.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

उत्तरपत्रिका व नमुना उत्तरपत्रिका याबाबतची माहिती गोपनीयतेच्या कारणावरून नाकारण्यात आली. नमुना उत्तरपत्रिकांच्या प्रती मिळाव्या, अशी मागणी अपीलकर्ता श्री. अनिल हिराचंद शहा यांनी केली.

महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर यांचेकडील विनियम, १९७७ मधील तरतुदीनुसार नमुना उत्तरपत्रिका ह्या गोपनीय दस्त ऐवज असतात. फक्त परीक्षाकामी नियुक्त केलेल्या परीक्षक / नियामक यांच्यासाठीच मार्गदर्शिका म्हणून तयार केल्या जातात, परंतु प्रकाशित केल्या जात नाहीत. मात्र त्या नाकारण्यामागे माहिती लपविण्याचा व खोटी माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचीव, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर श्री. अरुण दत्तात्रय कांबळे यांनी केले.

श्री. शहा व त्यांचे प्रतिनिधी श्री. जयंत जोशी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दरम्यान उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रांची पडताळणी त्यांच्या समोर करून वस्तुस्थिती निदर्शनास आणली होती, असे अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सचीव, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर सौ. यु.व्ही.पाटील यांनी लेखी निवेदनाद्वारे नमूद केले.

श्री. शहा यांनी फेब्रुवारी २००६ मधील परीक्षेच्या नमुना उत्तरपत्रिकांची मागणी केली आहे. परीक्षा होऊन गेल्यालाही तीन वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. तसेच नमुना उत्तरपत्रिका गोपनीय मानता येणार नाही. परीक्षेचा निकाल लागल्यानंतर स्वयंमूल्यमापनासाठी परीक्षार्थींनी त्याच्या प्रती मागणी केल्यास उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. श्री. शहा यांना या प्रती द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. शहा यांच्या मागणीनुसार इ. १२ वीच्या फेब्रुवारी २००६ च्या विज्ञान शाखेच्या सर्व विषयांच्या नमुना उत्तरपत्रिकांच्या प्रती त्यांना पाठविण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचीव, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर श्री. अरूण दत्तात्रय कांबळे यांनी दि. १०.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २१.१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. दिलीप एकनाथ निकम
नव महाराष्ट्र कॉलेज समोर, सोपान कुदळे बिल्डिंग,
घरनं.१, पिंपरीगाव, पुणे-३७ **अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहाय्यक आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** प्रभारी प्रशासन अधिकारी,
सुरक्षा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८९/२००९/पुणे |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१२.११.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - माजी सैनिक रखवालदार कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चिती संदर्भात | |

## विवेचन

अपीलकर्ता, श्री. दिलीप एकनाथ निकम यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इत्यादी कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील दाखलस्तराव नाकारण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : २९/१२/२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विठ्ठल शामराव कुबडे
योगेश्वरी कॉलनी, ७९०/३५, पाचगाव रोड, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ (मर्या.),
जूहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस मार्ग क्र.९,
जे.व्ही.पी.डी. स्कीम, जूहू मुंबई

**जन माहिती अधिकारी**
महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ (मर्या.),
जूहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस मार्ग क्र.९,
जे.व्ही.पी.डी. स्कीम, जूहू मुंबई

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **२००२/२००९/ कोल्हापूर** |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने मूळ माहिती मागणीचा बोध होत नाही | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विठ्ठल शामराव कुबडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** २८.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

ॲड. रणजीतसिंह घाटगे
१२९५/१-ए, बी वॉर्ड, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

विरुध्द

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**

**१)** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर.
**२)** शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **२००३/२००९/ कोल्हापूर + २००४/२००९/कोल्हापूर** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९-०९-२००९ व १८-०९-२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०-१०-२००९ |
| ३ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-</u>**<br>१) इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना मंजूरी मिळणेसंदर्भातील शिफारसींबाबत<br>२) श्री. गायकवाड, पंचायत समिती, पन्हाळा यांनी केलेल्या शाळा तपासणीचा अहवाल व तपासणीतील निष्कर्ष | |

## विवेचन

अपीलकर्ता ॲड. रणजीतसिंह घाटगे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीनुसार अपिलीय प्राधिका-याकडे अपील केले नसल्याचे स्पष्ट होते. सबब, ॲड. घाटगे यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

दोन्ही अपीले दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३-१२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. इसाक अब्दुलहक्क पटेल
बंदी क्र. सी-४६०५, मंडल क्र. ६/४
कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** वरिष्ठ तुरुंग अधिकारी (न्यायलय विभाग),
जिल्हा कारागृह, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **२०१४/२००९/ कोल्हापूर** |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>शिक्षेअंतर्गत भोगलेल्या दिवसांचा तपशील | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. इसाक अब्दूलहक्क पटेल यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३ -१२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सदानंद तुकाराम आमते — **अपीलकर्ता**
मु.पो. कोथळी, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर — **उत्तरवादी**
**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार करवीर, ता. करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **२०१९/२००९/ कोल्हापूर** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५-०६-२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. --- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७-०७-२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३-११-२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने मूळ माहिती मागणीचा बोध होत नाही | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सदानंद तुकाराम आमते यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२३-१२-२००९